# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा. क्रं. 122/2024 दिनांक : 03.04.2024**

## 1)चोरी :–

**1)मुखेड** :–दिनांक 02.04.2024 रोजी 14.30 वा. चे सुमारास, **बसस्टॅन्ड मुखेड येथील प्लॅटफॉर्मवर मुखेड ते राजुरा जाणारे बस मध्ये ता. मुखेड ता. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे मुखेड येथील प्लॅटफॉर्मवर मुखेड ते राजुरा जाणारे बस मध्ये बोरगाव येथे जाण्यासाठी गर्दीत चढत असताना फिर्यादीचा खिशा कापून सोन्याचे दागीने एकुण किंमती 1,44,000/– रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी गणपतराव धोंडीबा शिंदे वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. बोरगाव ता. मुखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 114/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री चव्हाण, मो.नं. 9923481762** हे करीत आहेत.

**2)भोकर** :–दिनांक 02.04.2024 रोजी 02.30 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे शेतातील विहीरीवर मौजे साळवाडी शेत शिवार ता. भोकर ता. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे शेतातील विहीरीवरील पाच होर्स पावरची विद्युत मोटार किंमती 15,000/– रूपयाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी जहहिंद शिवलाल चव्हाण वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा. चित्तगीरी ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 101/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री देवकांबळे, मो.नं. 9623979181** हे करीत आहेत.

## 2)विवाहीतेचा छळ :–

**उस्माननगर :– सन** 2018 ते दिनांक 02.04.2024 चे दरम्यान, **मौजे कापशी गुंफा ता. लोहा जि. नांदेड ह.मु. बामणी ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद सात आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु तुझ्या माहेरहुन ऑटो खरेदीसाठी दोन लाख रूपये घेवून ये म्हणुन फिर्यादीस शिवीगाळ व मारहाण करून, शारिरीक व मानसीक छळ केला व दोन्ही मुले जबरदस्तीने नेले. वगैरे **फिर्यादी** 31 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 52/2024 कलम 498(अ),323 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2536 राठोड, मो.क्रं. 9822630689** हे करीत आहेत.

## 3)प्राण्यांना क्रुरतेने वागणुक :–

**विमानतळ :–** दिनांक 02.04.2024 रोजी 05.30 वा. चे सुमारास, **पेट्रोल पंप नांदेड जवळ नांदेड कडे येणारे रोडवर विमानतळ, नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी त्याचे ताब्यातील दोन बैल गोवंश जनावरे एकुण किंमती 80,000/–रूपयाचे त्यांची कोणत्याही प्रकारची काळजी न घेता त्यांना टाटा एस कंपनीचा छोटा हत्ती वाहन क्रमांक एम.एच.–22/ए.ए.–2458 मध्ये कत्तलीच्या उद्देशाने घेवून जात असताना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2166 दारासिंग लच्छमाजी राठोड, ने. पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 101/2024 कलम 5(ब) महाराष्ट्र प्राणीसंरक्षण कायदा अधिनियम 1976 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/344 राणे, मो.क्रं. 9970391886** हे करीत आहेत.

## 4)जुगार :–

**धर्माबाद :–** दिनांक 02.04.2024 रोजी 15.30 वा. चे सुमारास, **आंध्रा बसस्थानक धर्माबाद येथील स्वागत धाब्या सतोर ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या आय.पी.एल. 2024 रोजी राजस्थान रॉयल्स व मुंबई इंडियन या 20–20 क्रिकेट सामन्या वरील ऑनलाईन सटयावर पैसे घेवून खेळत व खेळवीत असताना एक मोबाईल व नगदी रूपये असा एकुण किंमती 12,500/–रूपयाचा मुद्देमाल व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/724 महेश रमेशराव माकुरवार, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 85/2024 कलम 12(अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/1135 संगेवार,** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबीशन :–

**1)मुक्रामाबाद :–** दिनांक 02.04.2024 रोजी 18.32 वा. चे सुमारास, **मुक्रमाबाद ते देगलुर जाणारे रोडवर सुवर्णकार समशानभूमीलगत मोकळया जागेत मौजे मुक्रामाबाद ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारू किंमती 6000/–रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री शरीफ हबीबखा पठाण, ने. पोस्टे मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 66/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1996 आडेकर, मो.नं. 8668750448** हे करीत आहेत.

**2)कुंटूर :—** दिनांक 02.04.2024 रोजी 12.30 वा. चे सुमारास, **मौजे नायगाव ते नांदेड जाणारे रामदेव बाबा राजस्थानी धाब्याचे पाठीमागील बाजूस ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3360/—रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1198 कंधारे, ने. पोस्टे कुंटूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर** गुरनं 63/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1198 कंधारे, मो.नं. 8856080025** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड